वृद्धेच्या अंगावरील दागिने लुटले

अहिल्यानगरः- केडगाव येथील सोनेवाडी फाट्यावर एसटी बसची वाट पाहत उभ्या असलेल्या ७५ वर्षीय वृद्धेस मुलगा आबासाहेबचा मित्र असल्याचे सांगून एका दुचाकीस्वाराने सारोळा गावात सोडण्याच्या बहाण्याने लिफ्ट दिली. वाटेत गप्पा मारत विश्वास संपादन करून दुचाकीच्या पेट्रोल टाकीवर ठेवलेल्या पिशवीतील सोन्याचे दागिने लांबविल्याची घटना घडली. याप्रकरणी वत्सलाबाई विश्वनाथ काळे (रा. सारोळा कासार) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

आकाशवाणी केंद्राच्या आवारातून चंदनाची तीन झाडे चोरीस

अहिल्यानगर : शहरातील सावेडी परिसरातील आकाशवाणी केंद्राच्या आवारातून अज्ञात चोरट्याने परिसरातील कंपाऊडच्या आत प्रवेश करून सुमारे १५ हजार रुपये किमतीची चंदनाची तीन झाडे चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.चोरट्यांनी पोलिसांना आव्हान दिले आहे. चोरीचे ठिकाण पोलीस स्टेशन समोरच आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. २४ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १८१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

25 ऑक्टोबर रोजी अनुभवता येणार 'हर घर धुरंधर

मुंबई : भव्यता, थरार आणि नेत्रदीपक मनोरंजनाचा अनुभव! या ऑक्टोबरमध्ये 'धुरंधर' चित्रपट भारतभरातील आपल्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठणार आहे. प्रथमच हा चित्रपट फ्रीडिश प्रेक्षकांसाठी उपलब्ध होणार आहे. रणवीर सिंहचा उत्कंठा वाढवणारा स्पाय थ्रिलर चित्रपट 'धुरंधर' 25 ऑक्टोबर 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता स्टार उत्सव मूव्हीज, कलर्स सिनेप्लेक्स बॉलिवूड आणि कलर्स सिनेप्लेक्स सुपरहिट्स या तिन्ही वाहिन्यांवर एकाच वेळी प्रदर्शित होणार आहे.देशासाठी पडद्यामागे राहून गुप्तपणे कार्य करणाऱ्या 'अज्ञात वीरां'ना समर्पित असलेला 'धुरंधर' हा चित्रपट ॲक्शन आणि थराराने भरलेला आहे. या चित्रपटात रणवीर सिंह एका आक्रमक आणि अविस्मरणीय भूमिकेत दिसणार असून, त्यांच्यासोबत अक्षय खन्ना, संजय दत्त, आर. माधवन, अर्जुन रामपाल, राकेश बेदी आणि सारा अर्जुन यांसारख्या दिग्गज कलाकार पाहायला मिळणार आहेत.

सीडीएसएलकडून रीइमॅजिन आयडियाथॉन 2.0 लाँच

मुंबई : सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("सीडीएसएल") या आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १९ कोटींहून अधिक डीमॅट खात्यांची विश्वासू संरक्षक कंपनीने आज रीइमॅजिन आयडियाथॉन २.० लाँच केले. अधिकाधिक वैविध्यपूर्ण आणि डिजिटल होत चाललेल्या गुंतवणूकदार वर्गासाठी आर्थिक जागरूकता आणि सायबर सुरक्षा अधिक मजबूत करू शकतील असे नाविन्यपूर्ण सोल्युशन्स विकसित करण्यासाठी देशभरातील विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे.भारतात 'समज से इन्व्हेस्टिंग सिम्पल' संकल्पनेअंतर्गत साजऱ्या होत असलेल्या वर्ल्ड इन्व्हेस्टर वीक २०२६ दरम्यान सुरू झालेली ही आयडियाथॉन सेबीच्या 'प्रोजेक्ट जागरूक'च्या गुंतवणूकदार जागरूकता आणि शिक्षण उद्दिष्टांना पूरक ठरते. सेबीचा हा प्रकल्प आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी, माहितीवर आधारित गुंतवणूक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आर्थिक फसवणुकीविषयी जागरूकता वाढवण्यासाठी सेबी आणि सीडीएसएलसह सिक्युरिटीज मार्केट पार्टनर्सना एकत्र आणतो.

एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडला ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्र प्राप्त

नवी दिल्ली: भारतातील आघाडीच्या कन्झ्युमर ड्युरेबल्स कंपन्यांपैकी एक असलेल्या एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने (एलजीई इंडिया) सलग तिसऱ्या वर्षी ग्रेट प्लेस टू वर्क® सर्टिफिकेशन™ मिळवले आहे. कार्यसंस्कृती आणि कर्मचारी अनुभवावर जागतिक स्तरावर प्राधिकृत असलेल्या ग्रेट प्लेस टू वर्क® ने, ट्रस्ट इंडेक्स™ सर्वेक्षणाद्वारे मिळालेला कर्मचाऱ्यांचा अभिप्राय आणि कार्यसंस्कृतीच्या मूल्यांकनावर आधारित एलजीई इंडियाला हे प्रमाणपत्र बहाल केले आहे. कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनाचा विचार करून, हे मूल्यांकन विश्वास, सहभाग आणि दैनंदिन कामाचा अनुभव एखाद्या संस्थेची संस्कृती कशी घडवतात, याची सखोल माहिती देते.

धुळे जिल्ह्यातील शेतकरी बनत आहेत महत्त्वाचे भागीदार

धुळे :भारताची ऊर्जा सुरक्षा केवळ वीज निर्मितीवर अवलंबून नसून, वीजनिर्मिती केंद्रांमधून घरे, शेती आणि उद्योगांपर्यंत वीज पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेल्या सक्षम पारेषण यंत्रणेवरही अवलंबून आहे. देशभरात या पायाभूत सुविधांचा विस्तार होत असताना, वीज पारेषण मार्गांसाठी जमीन उपलब्ध करून देणारे शेतकरी आणि ग्रामीण जमीनधारक देशाच्या पायाभूत विकासातील महत्त्वाचे भागीदार म्हणून पुढे येत आहेत.धुळे जिल्ह्यातीलबळसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पहा शेती, ग्रामीण समुदाय आणि देशाच्या वाढत्या ऊर्जेच्या गरजा यांच्यातील महत्त्वाचा दुवा अधोरेखित करतो.



जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत सोने-चांदी स्वस्त ! दोन दिवसांत चांदीच्या दरात मोठी घसरण

जळगाव : दसऱ्यानंतर जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत सोने आणि चांदीच्या दरात सुरू झालेली घसरण शुक्रवारीही कायम राहिली. विशेषतः चांदीच्या दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे ग्राहकांचे लक्ष सराफा बाजाराकडे वेधले गेले आहे. दिवाळी आणि लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर सोने-चांदीचे दर कमी झाल्याने दागिने, चांदीच्या वस्तू आणि भेटवस्तू खरेदीचा विचार करणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र, दर घसरूनही बाजारात अपेक्षित खरेदीचा उत्साह अद्याप दिसून येत नाही.

जळगावच्या सराफा बाजारात गुरुवारी सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम ८२४ रुपयांची घट झाली होती. त्यामुळे तीन टक्के जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४८ हजार ११४ रुपयांवर आला होता. शुक्रवारी बाजार सुरू होताच सोन्याच्या दरात आणखी १,१२३ रुपयांची घसरण नोंदविण्यात आली. परिणामी, जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १ लाख ४६ हजार ९९१ रुपयांपर्यंत खाली आला. सोन्याच्या दरातील या घसरणीमुळे सणासुदीच्या खरेदीसाठी नियोजन करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. विशेषतः आगामी दिवाळी आणि लग्नसराईसाठी दागिने खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी ही दरातील घसरण महत्त्वाची ठरत आहे.

सोन्याच्या तुलनेत चांदीच्या दरात अधिक मोठी घसरण पाहायला मिळाली. गुरुवारी चांदीच्या दरात ६,१८० रुपयांची



घट झाल्याने जीएसटीसह प्रति किलो दर २ लाख १० हजार १२० रुपयांवर आला होता. शुक्रवारी पुन्हा ६,१८० रुपयांची घसरण नोंदविण्यात आली. त्यामुळे चांदीचा दर जीएसटीसह प्रति किलो २ लाख ३ हजार ८५० रुपयांपर्यंत खाली आल्याचे नमूद करण्यात आले आहे. सलग दोन दिवसांच्या घसरणीमुळे चांदी खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या ग्राहकांचे लक्ष बाजाराकडे लागले आहे. चांदीचे दागिने, पूजेच्या वस्तू, भेटवस्तू तसेच गुंतवणुकीसाठी खरेदी करणाऱ्यांना या घसरणीचा फायदा होऊ शकतो. दुसरीकडे, दर आणखी कमी होतील या अपेक्षेने काही ग्राहक खरेदीसाठी प्रतीक्षा करण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचा परिणाम देशांतर्गत सोने आणि चांदीच्या किमतींवर होत असतो. ऊर्जा किमतींमधील वाढ, महागाईची चिंता, अमेरिकेतील आर्थिक आकडेवारी आणि व्याजदरांबाबतच्या अपेक्षा यामुळे मौल्यवान धातूंच्या बाजारात चढ-उतार होऊ शकतात.अमेरिकेतील महागाईची आकडेवारी आणि फेडरल रिझर्व्हच्या संभाव्य निर्णयांकडे गुंतवणूकदारांचे लक्ष असते. व्याजदर दीर्घकाळ उच्च राहण्याची शक्यता निर्माण झाल्यास डॉलर आणि रोख्यांवरील परताव्यात बदल होऊ शकतो. त्याचा परिणाम सोने आणि चांदीमधील गुंतवणुकीच्या आकर्षकतेवरही होऊ शकतो. दिवाळी जवळ येत असताना सोने-चांदीच्या दरात झालेली घसरण ग्राहकांसाठी खरेदीची संधी मानली जात आहे. मात्र, बाजारातील अनिश्चिततेमुळे अनेक ग्राहक दर आणखी कमी होण्याची शक्यता लक्षात घेऊन खरेदीचा निर्णय पुढे ढकलू शकतात. आगामी काळात आंतरराष्ट्रीय बाजारातील हालचाली, डॉलरचे मूल्य, महागाईची आकडेवारी आणि व्याजदरांबाबतच्या अपेक्षांनुसार सोने-चांदीच्या दरात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खरेदीदारांचे लक्ष आता पुढील दरबदलांकडे लागले आहे.

शेवग्याच्या झाडाआड गांजाची शेती!; वृद्धासह दोघे पोलिसांच्या जाळ्यात

वाटापूरमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचा छापा; 5 किलो गांजा जप्त

अहिल्यानगर : शेवग्याच्या पिकाआड गांजाची लागवड करून अवैध व्यवसाय सुरू असल्याचा प्रकार नेवासा तालुक्यातील वाटापूर येथे उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि सोनई पोलिसांनी संयुक्त कारवाई करत शेवग्याच्या झाडांमध्ये लपवून लावलेली गांजाची लहान-मोठी झाडे जप्त केली. या कारवाईत ५ किलो वजनाचा, अंदाजे २ लाख ५५ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला असून, एका ८१ वर्षीय वृद्धासह दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध व्यवसायांची माहिती घेत होते. पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, नेवासा तालुक्यातील वाटापूर येथील रखमाजी कुशाबा आयनर याने वाट्याने कसण्यासाठी घेतलेल्या शेतात शेवग्याच्या पिकामध्ये गांजाची लागवड केली आहे. या माहितीची सोनई पोलिसांना सांगण्यात आली.

उपविभागीय पोलीस अधिकारी, शेवगाव विभाग यांच्या आदेशानुसार सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसमक्ष संबंधित शेताची पाहणी केली. यावेळी शेवग्याच्या पिकामध्ये गांजाची लहान-मोठी झाडे आढळून आली. कारवाईत रखमाजी कुशाबा आयनर (वय ८१, रा. वाटापूर, ता. नेवासा) आणि सोपान गुजाबा रूपनर (वय ४६, रा. अंमळनेर, ता. नेवासा) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. घटनास्थळावरून ५.१० किलो वजनाची गांजाची झाडे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत २ लाख ५५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अमली पदार्थविषयक कायद्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला . पुढील तपास सोनई पोलीस करत आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनांनुसार, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि सोनई पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली. शेवग्याच्या पिकाआड गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघड झाल्याने नेवासा तालुक्यात खळबळ उडाली आहे.

पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या मतदानासाठी मतदारांचा प्रतिसाद



०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज, शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. मतदानाची प्रक्रिया दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. परभणी जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे.

पात्र पदवीधर मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन निर्भयपणे आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

युवकाला रस्त्यात अडवून बेदम मारहाण; दोघांविरोधात गुन्हा दाखल

राहुरी: दोन वेळा बॉसने समज देवुनही तो बॉसला आडवा लागतो, ऐकत नाही, आज त्याला जिवंत सोडायचे नाही, असे म्हणुन आरोपीने नितीन गाडे यांना दगड व शॉकअप च्या रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना दि. २२ ऑक्टोबर रोजी दुपारी राहुरी शहरातील शिव चिदंबर मंगल कार्यालया जवळ घडली.

नितीन नंदकिशोर गाडे, वय ३७ वर्षे, रा. बारागाव नांदुर, ता. राहुरी, हे दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास राहुरी येथुन बारागाव नांदुर येथे मोटारसायकलवर घरी जात होते. त्यावेळी शिवचिदंबर मंगल कार्यालया जवळ विनानंबर होंडा शाईन मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी नितीन गाडे यांना थांबण्याचा इशारा केला. त्यावेळी दोघांपैकी एका आरोपीने नितीन गाडे यांना दगड व शॉकअप च्या रॉडने बेदम मारहाण केली. तेव्हा मोटारसायकलवर बसलेला आरोपी दुसऱ्या आरोपीला म्हणाला की, याचे डोक्यात रॉड घालुन याचा मेंदु बाहेर काढ. याला आज जिवंत सोडु नको, याला दोन वेळा बॉसने समज देवुनही तो बॉसला आडवा लागतो, ऐकत नाही. आज त्याला जिवंत सोडायचे नाही. असे म्हणुन पून्हा शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच आरोपीने गाडे यांच्या खिशातील ७ हजार रुपए रोख रक्कम काढून घेतली.

या घटनेत नितीन नंदकिशोर गाडे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तेथेच त्यांनी पोलिसां समक्ष जबाब नोंदवीला. त्यानुसार राहुरी पोलीस ठाण्यात दोन अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ११९१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे शिवीगाळ व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटाला हे करीत आहे.

लाचखोर तलाठी पाच हजारांच्या लाचेसह जाळ्यात

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

नांदेड : शेतजमीन वारस नोंद करण्यासाठी आणि कागदपत्रे नावावर करण्याच्या मोबदल्यात बारा हजार रुपयांची लाच मागणाऱ्या तसेच तडजोडीअंती पाच हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. भोकर तालुक्यातील चिदगिरी सज्जामधील तलाठी कार्यालयात ही धडक कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. साहेबराव हैबती टोमके असे लाचखोर तलाठ्याचे नाव असून, तो चिदगिरी सज्जा येथे ग्राम महसूल अधिकारी म्हणून कार्यरत होता.

तक्रारदार यांच्या पत्नीचे निधन झाल्यानंतर त्यांच्या मालकीची भोकर तालुक्यातील चिदगिरी येथील शेतजमीन तक्रारदार यांच्या नावावर करावयची होती. या कामासाठी कागदपत्रांची पूर्तता करून संमतीपत्र मागितले असता, तलाठी साहेबराव टोमके याने शेतजमीन नावावर करण्यासाठी १२ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. या प्रकाराला कंटाळून तक्रारदार यांनी नांदेड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे अधिकृत तक्रार नोंदवली.

प्राप्त तक्रारीच्या आधारे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २२ ऑक्टोबर रोजी भोकर येथील तलाठी कार्यालयात लाचेच्या मागणीची पडताळणी केली. या पडताळणीदरम्यान आरोपी तलाठ्याने १२ हजार रुपयांची मागणी कायम ठेवून तडजोडीअंती प्रथम ५ हजार रुपयांची लाच स्वीकारण्याचे आणि उरलेले ७ हजार रुपये दोन दिवसानंतर देण्याचे मान्य केले. त्यानुसार त्याच दिवशी सायंकाळी सापळा रचण्यात आला. आरोपी तलाठी साहेबराव टोमके याने तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच रक्कम स्वीकारताच लाचलुचपत पथकाने त्याला ताब्यात घेतले. भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक प्रिती जाधव व पथकाने ही कारवाई केली आहे.

फटाके बनवत असताना भीषण स्फोट; 7 जणांचा मृत्यू, अख्खं गाव हादरलं

सिवान : बिहारच्या सिवान जिल्ह्यातील आलमपूर या गावात संध्याकाळी फटाके बनवताना भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत सुमारे 7 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील पाच जणांचा समावेश असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने अद्याप मृतांचा आकडा स्पष्ट केलेला नाही.

मिळालेल्या महितीनुसार, फटाकेचे व्यापारी अमीरुद्दीन यांच्या घरात नेहमीप्रमाणे फटाके बनवण्याचे काम सुरू होते. त्याचवेळी अचानक आग लागली आणि फटाक्यांचा स्फोट होऊ लागला. शुक्रवारी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. स्फोट इतका भयानक होता की घराचे मोठे नुकसान झाले.

या दुर्घटनेत फटाके व्यावसायिक अमीरुद्दीन, त्यांच्या तीन नाती, एक नातू आणि दोन मजुरांचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे. मात्र, सिवानचे जिल्हाधिकारी विजय प्रकाश मीणा यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत दोन ते तीन मृतदेहच बाहेर काढण्यात आले आहेत. इतर व्यक्ती ढिगाऱ्याखाली अडकल्या असण्याची शक्यता आहे. बचाव पथकाकडून घटनास्थळी शोधमोहीम सुरू असून, संपूर्ण तपासणीनंतरच मृतांचा नेमका आकडा स्पष्ट होणार आहे.

या स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की त्यामुळे संपूर्ण गाव हादरून गेले आहे. हे सुरुवातीला कोणालाही समजत नव्हते, त्यानंतर अमीरुद्दीन यांच्या घरात स्फोट झाल्याचे समजले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.

हिंगोली जिल्ह्यात तीन धरणे, पाणी मात्र जिल्ह्याबाहेर; कयाधूसाठी 85 गावांचा एल्गार!

सिंचनाचा 15 हजार 160 हेक्टरचा अनुशेष कायम; कयाधू नदीचे पाणी वाचविण्यासाठी 3 नोव्हेंबरला भव्य जनआंदोलन; डॉ. रमेश शिंदे यांची पत्रकार परिषदेत माहिती

हिंगोली : जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळत नसताना येलदरी, सिद्धेश्वर आणि इसापूर या तीन धरणांशी संबंधित जलसाठ्याचा लाभ जिल्ह्याबाहेरील भागांना अधिक मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. जिल्ह्यात सिंचनाचा तब्बल १५ हजार १६० हेक्टरचा अनुशेष कायम असतानाच, आता हिंगोली जिल्ह्याची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या कयाधू नदीचे पाणी भूमिगत बोगद्याद्वारे इसापूर धरणाकडे वळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप कयाधू नदी बचाव संघर्ष समितीने केला आहे. या पार्श्वभूमीवर कयाधू नदीचे पाणी वाचविण्यासाठी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी ८५ गावांच्या सहभागातून भव्य जनआंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे डॉ. रमेश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. शिंदे यांनी हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाच्या प्रश्नासह कयाधू नदीच्या पाणी वळविण्याच्या प्रस्तावावर आपली भूमिका मांडली. त्यांच्या माहितीनुसार, येलदरी धरणातून हिंगोली जिल्ह्याला सुमारे आठ टक्के, सिद्धेश्वर धरणातून २८ टक्के, तर इसापूर धरणातून अवघे १५ टक्के पाणी मिळते. परिणामी, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणींचा सामना करावा लागत असून, सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कयाधूचे ३.५४ टीएमसी पाणी वळविण्याचा आरोप

कयाधू नदीचे १००.४६ दशलक्ष घनमीटर म्हणजेच सुमारे ३.५४ टीएमसी पाणी २० किलोमीटर लांबीच्या भूमिगत बोगद्याद्वारे इसापूर धरणाकडे वळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप संघर्ष समितीने केला आहे. हा प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यास सुमारे ७७ किलोमीटर लांबीच्या कयाधू नदीच्या प्रवाहावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून नदीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.



एकीकडे हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष कायम आहे, तर दुसरीकडे उपलब्ध जलस्रोतांवर परिणाम करणारे प्रकल्प प्रस्तावित होत असल्याने भविष्यात पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

९५० कोटींच्या बोगदा प्रकल्पावर प्रश्नचिन्ह

प्रस्तावित बोगदा प्रकल्पासाठी सुमारे ९५० कोटी रुपये खर्च करण्यात येत असल्याचे सांगताना, प्रत्यक्षात आतापर्यंत केवळ पावणेदोन किलोमीटर बोगद्याचे काम झाल्याची माहिती डॉ. शिंदे यांनी दिली. या प्रकल्पाची नियमबद्धता, त्याचे परिणाम आणि हिंगोली जिल्ह्याच्या पाण्याच्या हक्काचा विचार याबाबत प्रश्न उपस्थित करत त्यांनी संबंधित यंत्रणांनी वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी केली.

नांदेड जिल्ह्यातील सिंचनाच्या विकासासाठी हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीचे पाणी वळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणात माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या भूमिकेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. तसेच, हिंगोली जिल्ह्यातील दोन खासदार आणि आमदारांनी या प्रश्नावर ठोस भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली.

कयाधू नदी बचावासाठी ८५ गावांमध्ये जनजागृती

कयाधू नदी बचाव संघर्ष समितीच्या वतीने गेल्या दोन वर्षांपासून हा लढा सुरू असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. आता या आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्यासाठी हिंगोली आणि सेनगाव तालुक्यांतील ८५ गावांमध्ये बैठका आयोजित करण्यात येत आहेत.

या बैठकांमध्ये 'कयाधू नदी बचाव — सत्य परिस्थिती व पुरावे' या विषयावर माहिती देण्यात येणार आहे. प्रस्तावित बोगदा प्रकल्पाची वस्तुस्थिती, कयाधू नदीच्या पाण्याचे महत्त्व आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली जाणार आहे.

३ नोव्हेंबरला जलआंदोलन; ग्रामस्थांना सहभागी होण्याचे आवाहन

'कयाधू नदी बचाव म्हणजे आपले भविष्य वाचवा' या संकल्पनेतून ३ नोव्हेंबर २०२६ रोजी व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील पाण्यावरील हक्काचे संरक्षण, सिंचनाचा अनुशेष दूर करणे आणि कयाधू नदीचे अस्तित्व टिकवून ठेवणे, या प्रमुख मागण्यांसाठी हा लढा उभारण्यात येत असल्याचे समितीने स्पष्ट केले.

हिंगोली आणि सेनगाव तालुक्यांतील शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांनी गावनिहाय बैठकांना तसेच ३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या जलआंदोलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कयाधू नदी बचाव संघर्ष समितीचे डॉ. रमेश शिंदे यांनी केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

आंदोलनाचा अधिकार आणि कायदेशीर चौकटीचे भान

दिल्ली उच्च न्यायालयाने ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या (AISA) राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावत, शांतता राखण्यासाठी १०,००० रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि हमीदार सादर करण्याच्या दंडाधिकाऱ्यांच्या आदेशावर शिक्कामोर्तब केले आहे. १६ ऑक्टोबर रोजी मंडी हाऊस परिसरातील एका आंदोलनादरम्यान त्यांना ताब्यात घेण्यात आल्यानंतर ही कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली होती. लोकशाहीमध्ये शांततापूर्ण मार्गाने आंदोलने करणे, सरकारवर टीका करणे किंवा आपले मत मांडणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असला, तरी सार्वजनिक सुव्यवस्था आणि कायद्याचे पालन करणे तितकेच महत्त्वाचे असते, हा संदेश या निकालातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. निवडणूक आयुक्तांविरोधातील आंदोलनाचा भाग म्हणून कनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये तिरंगा फडकवण्याचा आणि मंडी हाऊस येथे सभेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण होते आणि सरकार बदलण्याची मागणी करणे गुन्हा नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. मात्र, दुसरीकडे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी घटनास्थळी लागू असलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांचा (कलम १६३) आणि सुरक्षेच्या कारणांचा हवाला देत प्रशासकीय भूमिकेचे समर्थन केले. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर, कायदेशीर प्रक्रियेत पुरेशी सुरक्षा व्यवस्था असल्याचे स्पष्ट केले आणि दंडाधिकाऱ्यांना निष्पक्ष चौकशी करून सर्व कागदपत्रे याचिकाकर्त्याला उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. लोकशाही आणि कायदेशीर राज्य यात सलोखा राखणे हे न्यायव्यवस्थेसमोर नेहमीच एक आव्हान असते. आंदोलनाचे स्वातंत्र्य आणि कायद्याची चौकट या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एका बाजूला नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाही अधिकारांचा सन्मान राखला गेला पाहिजे, तर दुसरीकडे सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली असली तरी दंडाधिकाऱ्यांना निष्पक्ष चौकशीचे दिलेले निर्देश हे न्यायप्रक्रियेतील पारदर्शकतेची ग्वाही देणारे आहेत. आंदोलनाचा मार्ग कोणता असावा आणि कायद्याचे बंधन किती पाळावे, याचे भान प्रत्येक नागरिकाला आणि राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांना असणे आवश्यक आहे.

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्सला 174 कोटींची ऑर्डर

मुंबई : सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड ("सिग्मा"), एक जागतिक एरोस्पेस आणि संरक्षण अभियांत्रिकी व उत्पादन कंपनीने, आज जाहीर केले की त्यांना नाटो संरक्षण परिसंस्थेशी संलग्न असलेल्या एका उत्तर अमेरिकन ग्राहकाकडून १९.७० दशलक्ष अमेरिकी डॉलर (अंदाजे १७४ कोटी रुपये) किमतीची ऑर्डर मिळाली आहे. ही ऑर्डर १५५ मिमी तोफगोळ्यासाठी लागणाऱ्या विशेष सहाय्यक उपप्रणालींच्या उत्पादन आणि पुरवठ्याशी संबंधित आहे. ही ऑर्डर २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, आणि तिचे उत्पादन सिग्माच्या स्वतःच्या इकोसिस्टममध्ये केले जाईल. मे २०२६ पासून १५५ मिमी राऊंड्ससशी संबंधित हा सिग्माचा पाचवा प्रकल्प आहे, जो तोफखान्याच्या दारुगोळ्याच्या संपूर्ण मूल्य साखळीमध्ये कंपनीच्या वाढत्या क्षमता दर्शवतो.

तोतरेपणा हा कमी बुद्धिमत्तेचा नव्हे, तर बोलण्याच्या प्रवाहाशी संबंधित विकार

छत्रपती संभाजीनगर : दरवर्षी २२ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय तोतरेपणा जागरूकता दिन म्हणून पाळला जातो. तोतरेपणाबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे, या समस्येचा सामना करणाऱ्या व्यक्तींना समजून घेणे आणि त्यांच्याबद्दल असलेले गैरसमज दूर करणे हा या दिनाचा प्रमुख उद्देश आहे. तोतरेपणा ही बोलण्याच्या प्रवाहाशी संबंधित समस्या असून, त्याचा व्यक्तीच्या बुद्धिमत्तेशी किंवा क्षमतेशी थेट संबंध नसतो. योग्य मार्गदर्शन, स्पीच थेरपी आणि कुटुंबीयांच्या सहकार्याने बोलण्यातील अडचणी हाताळण्यास मदत होऊ शकते. मेडिकवर हॉस्पिटल चे कान नाक घासा तज्ञ डॉ शरद शेळके डॉ अतुल पोरे, डॉ रितेश भाग्यवंत , वाचा विकार तज्ञ डॉ प्रिया भाले व बालरोग तज्ञ डॉक्टर राहुल गोसावी यांनी सांगितले की तोतरेपणामध्ये बोलताना एखादा शब्द किंवा अक्षर वारंवार उच्चारणे, आवाज लांबवणे, बोलताना मध्येच अडखळणे किंवा काही शब्द उच्चारताना अडथळा जाणवणे अशी लक्षणे दिसू शकतात. काही व्यक्तींना बोलताना ताण येणे, डोळ्यांची उघडझाप वाढणे किंवा बोलण्याची भीती वाटणे अशा अडचणीही जाणवतात. विशेषतः लहान मुलांमध्ये भाषाविकासाच्या काळात काही वेळा बोलण्यात अडखळणे दिसू शकते. मात्र, ही समस्या सतत जाणवत असेल, वाढत असेल किंवा मुलाच्या संवादावर परिणाम होत असेल, तर स्पीच अँड लँग्वेज थेरपिस्टचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

बाणेरमध्ये 103 उद्योजकांचा सहभाग

पुणे : रविवार, 18 ऑक्टोबर रोजी आयोजित उद्यमी बाजारात पुणे हे सर्वाधिक उद्योजकांचा सहभाग असलेले शहर ठरले. बाणेर येथील एमराल्ड मल्टिपर्पज हॉलमध्ये सकाळी 10 ते दुपारी 3 या वेळेत आयोजित बाजारात पुण्यातील 103 उद्योजकांनी आपली उत्पादने आणि सेवा सादर केल्या. पुणे, ठाणे, मुंबई, नागपूर आणि नाशिक या 5 शहरांमध्ये सहभागी झालेल्या एकूण 233 उद्योजकांपैकी 103 उद्योजक पुण्यातील होते. पुण्यातील उद्यमी बाजाराला 2,000 व्हिजीटर्सनी भेट दिली. पाचही शहरांतील बाजारांना मिळून एकूण 3,000 व्हिजीटर्स उपस्थित होतेपुण्यातील उद्यमी बाजारात खाद्यपदार्थ, फॅशन आणि हस्तकलेच्या वस्तूंपलीकडे अनेक प्रकारची उत्पादने आणि सेवा पाहायला मिळाल्या. येथे मिलेटपासून तयार केलेले आरोग्यदायी खाद्यपदार्थ, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ आणि कृषी उत्पादने उपलब्ध होती. याशिवाय अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक उत्पादने, व्हेंडिंग मशीन, सॉफ्टवेअर आणि विविध व्यावसायिक सेवांचेही प्रदर्शन करण्यात आले.

'जेके नॅचरल्स ऑरा'सह सस्टेनेबल पेंट्स क्षेत्रात पदार्पण

छत्रपती संभाजीनगर : जेके मॅक्स पेंट्स या जेके सिमेंट लिमिटेडचा समृद्ध वारसा आणि तज्ज्ञतेचा आधार असलेल्या कंपनीने आपला नवीन सस्टेनेबल पेंट्स ब्रँड 'जेके नॅचरल्स' लाँच केला आहे, तसेच जेके नॅचरल्स ऑरा हे ब्रँडचे पहिले उत्पादन सादर केले आहे. भारताचा पहिला नेचर लव्हर्स पेंट म्हणून सादर करण्यात आलेला हा ब्रँड घराचे सुशोभीकरण आणि दैनंदिन जीवनातील सजग पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांचा सुरेख मेळ साधतो. आधुनिक घरांसाठी डिझाइन केलेले जेके नॅचरल्स ऑरा लक्झरी इंटिरियर इमल्शनमध्ये एअर-प्युरिफिकेशन तंत्रज्ञान आणि प्रीमियम फिनिशसह ४० टक्क्यांहून अधिक पर्यावरणपूरक घटक आहेत, ज्यामध्ये १० टक्क्यांहून अधिक बायो-आधारित इमल्शनचा समावेश आहे.डेन्मार्क येथील क्लीनटेक कंपनी आणि रिसायकलिंग क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी शार्क सोल्युशन्ससोबत सहयोगाने डिझाइन केलेल्या जेके नॅचरल्स ऑराच्या फॉर्म्युलेशनमध्ये मुदत संपलेल्या लॅमिनेटेड काचेपासून मिळवलेल्या रिसायकल केलेल्या पीव्हीबीचा (पॉलीविनाइल ब्युटिरल) समावेश करण्यात आला आहे.

मनोज जरांगेंच्या '500 कोटींच्या' क्लिपमुळे राजकीय भूकंप; पण धक्क्याची तीव्रता फॉरेन्सिकच ठरवणार

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी (22 ऑक्टोबर) पत्रकार परिषद घेऊन त्यांना 500 कोटी दिल्याच्या कथित दाव्याचा गौप्यस्फोट केला. पत्रकार परिषदेत त्यांनी एक वादग्रस्त ऑडिओ क्लिप जाहीर केली. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

मागील काही दिवसांपासून यावर चर्चा सुरू होती. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (21 ऑक्टोबर) जरांगे यांनी त्यांच्याकडे पुरावे असतील तर द्यावेत, असं आवाहन केलं होतं. त्यानंतर मनोज जरांगे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन या कथित 500 कोटी रुपयांची ऑडिओ क्लिप ऐकवली.

या क्लिपमध्ये शिवसेनेचे (शिंदे गट) खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडून मनोज जरांगे यांना 500 कोटी रुपये मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. अलीकडेच एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या आरोपांची पुष्टी करणारा हा पुरावा असल्याचा दावा जरांगे यांनी केला आहे.

मनोज जरांगे यांनी ही क्लिप प्रसारमाध्यमांसमोर आणल्यानंतर आता राजकीय प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली आहे. जरांगे यांनी माझ्याविरोधात कोण आर्थिक मदत पुरवतं, हे या क्लिपमधून स्पष्ट होतं, असा आरोप करत यात सहभागी होणाऱ्यांची चौकशी करावी, असं म्हटलं आहे.

तर शिंदेसेनेनं याप्रकरणी चौकशीची मागणी करत सत्य समोर आणण्याचं आवाहन केलं आहे. दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या नेत्यांनी या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी करावी असं म्हटलं आहे. विरोधकांनीही या निमित्तानं भाजपवर निशाणा साधला आहे. तर मनोज जरांगे पाटील यांच्याकडील क्लिपची एसआयटीमार्फत सखोल चौकशी व्हावी अशी मागणी भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केली.

जरांगे यांनी ऐकवलेल्या या ऑडिओ क्लिपची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. तसंच बीबीसीनंही या क्लिपची स्वतंत्ररित्या पुष्टी केलेली नाही.

आरोप, प्रत्यारोप आणि शिष्टमंडळ

शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी, "ही ऑडिओ क्लिप 14 ऑक्टोबर 2024 ची असेल तर ती दोन-अडीच वर्षं दडवून का ठेवली गेली, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या वेळी ती समोर का आली नाही? या क्लिपमागचं नेमकं कारण आणि वेळ याबद्दलही उत्तरं मिळाली पाहिजेत. मराठा आरक्षणासाठी एकनाथ शिंदेंचं योगदान नाकारता येणार नाही, पण या प्रकरणातील सर्व बाबींचा खुलासा होणं गरजेचं आहे." अशी मागणी काल पत्रकार परिषदेत केली.

दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्रात बोलताना गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले होते, "माझ्या मते मनोज जरांगे यांचं प्रत्येक वक्तव्य आणि सध्या ते करत असलेलं प्रत्येक आंदोलन हे पूर्णपणे राजकीय हेतूने प्रेरित आहे. ते नेमके कोणाच्या आशीर्वादाने काम करत आहेत, कोणासाठी काम करत आहेत किंवा त्यांच्या पाठीशी कोण आहे, यावर मला भाष्य करायचं नाही. मात्र, मनोज जरांगे आता मराठा समाजासाठी किंवा त्यांच्या हितसंरक्षणासाठी काम करण्यापेक्षा स्वतःचे राजकीय हितसंबंध जपण्याकडे अधिक लक्ष देत आहेत, असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही.

मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी आणि मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यकाळात मराठा समाजासाठी घेतलेले निर्णय हे महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या निर्णयांपैकी होते आणि त्यांची अंमलबजावणीही झाली. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या प्रत्येक वक्तव्यामागे मला राजकीय हेतू असल्याची भावना निर्माण होते."

या क्लिपची चौकशी व्हावी अशी मागणी करण्यासाठी शिवसेनेच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या शिष्टमंडळात विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, खासदार मिलिंद देवरा, खासदार रवींद्र वायकर, माजी खासदार राहुल शेवाळे, माजी मंत्री दीपक सावंत यांचा समावेश होता.

'माझ्याविरोधात मोठं षड्यंत्र', मनोज जरांगे आणखी काय म्हणाले?

: आपल्या विरोधात बोलणाऱ्या काही मराठा नेत्यांना, कार्यकर्त्यांना आर्थिक रसद पुरवून आंदोलनाची बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा जरांगेंनी केला.

या क्लिपची आणि त्यातील सहभागींची सखोल चौकशी करावी, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकार थांबवावा, अशी मागणी त्यांनी केली.

मनोज जरांगे म्हणाले, "आंदोलन चिरडण्याचा सर्वांचा उद्देश आहे. मराठा समाजावर गरळ ओकायची, मराठा समाज बदनाम करायचा, आंदोलन बदनाम करायचं, यासाठी सलग 3 वर्षांपासून आजपर्यंत सारखं माझ्याविरोधात षड्यंत्र सुरू आहे. हे कोण करतंय, किती मोठं हे प्रकरण आहे. मी किती वेदना सहन करत आहे, हे माझ्या मराठा समाजापर्यंत गेलं पाहिजे."

"मराठ्यांचं आंदोलन अन्याय करून बंद पाडायचं, त्रास देऊन बंद पाडायचं, जाणूनबुजून मराठा समाजाला व्यथा द्यायच्या. मराठा समाजाच्या लेकराबाळांचं वाटोळं कसं होईल, यासाठी कसे प्रयत्न केले जातात, कसे षड्यंत्र रचले जातात, हे आता मराठा समाजासमोर येणार आहे."

"किती स्वरुपाचं मोठं हे षडयंत्र आहे. मराठा समाजाने शब्दाशब्दांवर लक्ष ठेवावं. निवडणुकांच्या काळात ही षड्यंत्र, उपोषणाच्या काळातही षडयंत्र, आंदोलनाच्या काळातही षड्यंत्र. आसपास असणाऱ्या मराठा समाजालाही त्रास द्यायचा, मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना त्रास द्यायचा, आणि तो त्रास कशा प्रकारचा आणि तो किती भयंकर आहे, किती मोठ्याप्रमाणात डाव रचले जातात, हे सर्वांसमोर मांडणार आहे."

आज 23 ऑक्टोबर रोजी जरांगे यांनी नव्यानं पत्रकार परिषद घेतली. त्यात ते म्हणाले, "फडणवीस आणि शिंदे साहेबांच्या तपास यंत्रणा या प्रकरणाची चौकशी करतील. पण तुम्ही माझ्या डोक्याला डोकं लावू नका. तुम्हाला तारीख कशी माहिती झाली, यावरूनच या सगळ्या प्रकारात खूप गौडबंगाल असल्याचं दिसतं. यानंतर माझ्याबद्दल काहीही बोलू नका. मी तुमचा नोकर आहे का, तुम्ही म्हणाल ते ऐकायला? आमचं सर्व काही उघड आहे. रामदासभाई, मी तुमचा आदर करतो, पण तुम्ही आणि तुमच्या मुलाने नीट बोललं पाहिजे. शिंदे साहेबांना संपवायचं असतं तर आम्ही हे बाहेर आणलं नसतं. उलट आम्हाला शिंदेंचा स्वाभिमान होता म्हणून मराठा समाजाने त्यांना डोक्यावर घेतलं. तुम्ही आमचे लोक फोडले का, कोणत्या कोणत्या टीम तुम्ही सांभाळता हेही पुढे येईल. तुम्ही बोलायला सुरुवात केली तर मीही बोलायला सुरुवात करेन. फुसके बार सोडू नका, मर्दासारखं वागा. काही लोकांच्या जळाऊ वृत्तीमुळे शिवसेनेचं नुकसान होईल. फडणवीस साहेब बदनाम झाले पाहिजेत, ही काहींची इच्छा आहे. राज्यात सुरू असलेल्या खोट्या केसेसमागेही कोणाचा हात आहे का, हे तपासलं पाहिजे. शरद पवारांनी आम्हाला आरक्षण दिलं नाही, पण तुम्ही तर अन्नात विष कालवलंत. मला तुमचा नौकर समजता का?" असं म्हटलं.

'सगळे खुलासे झाले पाहिजेत, चौकशीतून सत्य समोर आणा' : मनोज जरांगे यांची पत्रकार परिषद संपताच राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी त्यांच्या आरोपांना उत्तर दिलं. त्यांनी याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले.

ते म्हणाले, "ही क्लिप मनोज जरांगे यांच्यापर्यंत कशी पोहोचली, कशापद्धतीने पोहोचली, याचं रेकॉर्डिंग कुठं झालं, रेकॉर्डिंग कोणी केलं, याच्यामध्ये कोणी विश्वासू माणूस आहे का, की हे रेकॉर्डिंग जाणीवपूर्वक जरांगे यांच्याकडे दिली गेली, म्हणजे शिवसेना आणि मराठा समाज याच्यामध्ये दुही निर्माण होईल. याचे सगळे खुलासे झाले पाहिजे, याची चौकशी झाली पाहिजे."

"जरांगे आणि आमच्यात मतभेद असतील, ते मतभेद आहेत म्हणून जरांगे यांचं आंदोलन संपवावं किंवा मनोज जरांगे संपवावेत आणि आम्हाला राजकीय फायदा मिळावा अशा प्रकारची भूमिका शिवसेनेची नाही," असंही त्यांनी स्पष्ट केलं.

यातील कोणताही आवाज भाजपच्या नेत्याचा नाही- शेलार

भाजप नेते आणि राज्याचे माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी पक्षाची भूमिका मांडली. ते म्हणाले, "बाजारात अशा ऑडिओ क्लिप्स खूप फिरत असतात. या ऑडिओ क्लिपमधील सत्यता तपासणं हे सर्वात महत्त्वाचं काम आहे. एखाद्या ऑडिओ क्लिपला त्याच्या पुरक गोष्टी नसतात, तोपर्यंत अशा कुठल्याही तंत्रज्ञानाच्या आधारे गोष्टीला पुरावा मानलाच जात नाही."

"मी भाजपच्या वतीने हे स्पष्ट करतो की, यामधील कोणताही आवाज भाजपच्या नेत्याचा नाही, ही कथित ऑडिओ क्लिप आहे. या कथित ऑडिओ क्लिपची मुख्यमंत्र्यांनी सखोल चौकशी करावी. ही क्लिप जरांगे यांच्यापर्यंत कोण पोहोचवली, ती आत्ताच कशी समोर आली? या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करणं हेही आम्हाला मान्य नाही," असं त्यांनी म्हटलं.

दरम्यान, याप्रकरणी जरांगे यांनी तक्रार करावी, सरकार योग्य ती चौकशी करेल असं भाजप नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं. कोणी जर सरकारला विनंती केली असेल तर चौकशी होईल, तो चौकशीचा भाग आहे. एकनाथ शिंदेंनीही चौकशी करून घ्या, असं म्हटलं आहे. त्यामुळे चौकशी होईल.

फॉरेन्सिक तपासणी करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी केली जाईल असं म्हटलं आहे. शुक्रवारी (23 ऑक्टोबर) नागपूर येथे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदानासाठी आल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना ही माहिती दिली.

"या क्लिपची फॉरेन्सिक तपासणी होईल. अडीच वर्षांनंतर हे संभाषण आत्ता बाहेर येण्याच्या पाठीमागे नेमके हेतू काय आहेत. कोणाला टार्गेट केलं जातंय, कशाकरिता केलं जातंय, या संदर्भातील अनेक प्रश्न आहे," असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं.

"मनोज जरांगे, शिवसेनेच्या शिष्टमंडळाने आणि भाजपनेही हीच मागणी केली आहे. त्यामुळे निश्चितपणे पूर्ण चौकशी करून यातील जे काही सत्य आहे, ते आम्ही बाहेर काढू," अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

हे तर 'शहा काट'शाहाचं' राजकारण दिसतंय- राज ठाकरे

दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी याप्रकरणी आपली भूमिका सोशल मीडियावर पोस्ट करून मांडली.

ते लिहितात, "भाजपचे काही पदाधिकारी, या पक्षाच्या सोशल मीडियात महत्त्वाची भूमिका बजावणारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी आणि स्वतःला निष्पक्ष राजकीय विश्लेषक म्हणवणारे पण खरंतर भाजपच्या चिखलफेक सैन्याचं चिलखत घालून फिरणारे काही युट्यूब प्रभावक यांच्यातल्या मैत्रीची 'फ्रेंडशिप फाईल' ऑडिओ क्लिप समोर आली आहे.

यामध्ये कोणी कोणाला 500 कोटी दिले, इथंपासून ते थेट माध्यमांना आम्ही कशी जरब दाखवू शकतो, ते एखादा भावनिक मुद्दा सरकारच्या अंगाशी आला तर लगेच त्या मुद्द्यापासून लोकांचं लक्ष कसं भरकटवायचं, यासाठी नवीन धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दा कसा रेटला पाहिजे, यासाठी काय केलं पाहिजे याचीही चर्चा ऐकायला येत आहे. भाजप कशा पद्धतीने समाज माध्यमं, माध्यमं यांच्यावर दडपशाही आणत आहे, यावर पण चर्चा व्हायला हवी."

"मुख्यमंत्र्यांनी ऑडिओ क्लिपचा फॉरेन्सिक रिपोर्ट मागवला आहे, असं म्हणून वेळ मारून न्यायचा प्रयत्न केला आहे. फॉरेन्सिक अहवाल हा ऑडिओ किंवा व्हीडिओची तथ्यता याबरोबर खून, बलात्कार, आर्थिक घोटाळे यांच्यासारख्या गंभीर गुन्ह्यात पुराव्यांची तथ्यता तपासण्यासाठी मागवला जातो.

यातलं संभाषण ऐकलं तर समजतं की, हा लोकशाहीचा खून आणि बलात्कारच आहे. म्हणजे जे बोललं आहे, ते गंभीर आहे आणि त्याची तपासणी व्हायला पाहिजे हे मुख्यमंत्र्यांना मान्य आहे हे बरं झालं. पुराव्यातील तथ्य तपासाच पण यामध्ये बोललं गेलं आहे, याबद्दल तुम्ही जर अनभिज्ञ असाल तर तुमच्या पाठीमागे काय काय सुरु होतं, हे पण तपासा."

"मुख्यमंत्री म्हणाले की, ही क्लिप 2 वर्षांपूर्वीची असावी, ती आत्ताच का आली? खरंतर ही क्लिप बाहेर आली कशी आणि ती आणली कोणी, हा पण महत्त्वाचा प्रश्न आहे. यांच्यात सरकारमधलं नेहमीप्रमाणे 'शहा काट'शाहाचं' राजकारणच दिसतंय.

फॉरेन्सिक अहवाल, त्यातील तांत्रिकता यात महाराष्ट्राला गोल-गोल घुमवू नका. महाराष्ट्राला जे कळायचं आहे, ते कळलं आहे, ते तुम्हाला मान्य आहे. मुख्यमंत्री म्हणून तुम्ही किती निष्पक्ष आहात आणि तुम्ही कारवाई केली आहे, हे महाराष्ट्राला दाखवून द्या. तरंच या फॉरेन्सिकला अर्थ आहे, अन्यथा तुमच्या फायद्यासाठी वाकवलेला फॉरेन्सिक ठरेल."

'दूध का दूध, पानी का पानी, झालं पाहिजे': तत्पूर्वी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी मनोज जरांगे यांच्या आरोपावर भाष्य करताना त्यांच्याकडे पुरावे असतील तर ते समोर आणावेत असं आवाहन केलं होतं.

दसरा मेळावा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी ते प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसमोर बोलताना म्हणाले होते की, आमचे प्रवक्ते आणि नेते त्यावर बोलत आहेत. कोणालाही 500 कोटी दिलेले नाहीत, 500 कोटी घेतलेलेही नाहीत, आणि ते देण्याचाही प्रश्न नाही.

"ज्या आधारावर मनोज जरांगे बोलत असतील तर त्यांनी त्याची शहानिशा आधी करायला हवी होती. त्यांच्याकडे जे काही पुरावे असतील, तेही त्यांनी संबंधित यंत्रणांकडे दिले पाहिजेत. त्याची चौकशी झाली पाहिजे, 'दूध का दूध, पानी का पानी' झालं पाहिजे."

एकनाथ शिंदे यांच्या या वक्तव्यानंतर जरांगे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद आयोजित करून 500 कोटी पोहोचवल्याच्या उल्लेखाची 2024 ची ऑडिओ क्लिप समोर आणली.

डॉक्टर, पोलीस, इंजिनिअर... 1000 जणांना हनीट्रॅपमध्ये अडकवणारा 'तो' असा अडकला पोलिसांच्या जाळ्यात

डॉक्टर, पोलीस, व्यावसायिक, सरकारी अधिकारी, सॉफ्टवेअर इंजिनिअर, प्राध्यापक... या सर्वांमध्ये काय सारखं असू शकतं?

हैदराबाद पोलिसांच्या मते, 23 वर्षीय पवन कुमारनं मुलींच्या नावानं बनावट सोशल मीडिया खाती तयार करून अशा सुमारे 1,000 जणांना हनीट्रॅपमध्ये अडकवलं.

चारमिनार विभागाचे डीसीपी किरण खरे सांगतात, "गेल्या चार वर्षांपासून तो कोलकात्यातील एका मॉडेलसह अनेक मुलींचे फोटो वापरून हनीट्रॅप रॅकेट चालवत होता आणि लोकांकडून पैसे उकळत होता. त्याच्या जाळ्यात भारतातील विविध राज्यांतील तसेच परदेशातील लोकही अडकले."

पोलिसांनी त्याच्याकडून तीन मोबाईल फोन, एक लॅपटॉप आणि 16 जीबीचा पेन ड्राइव्ह जप्त केला आहे.

मुलींच्या फोटोच्या आधारे बनावट खाती

कोंडाबाथुला पवन कुमार हा भद्राद्री कोठागुडेम जिल्ह्यातील तेकुलपल्ली मंडलचा रहिवासी आहे.

पोलिसांच्या चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, त्यानं हैदराबादमधील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ टूल डिझाईन (CITD) येथे डिप्लोमाचा अभ्यासक्रम दुसऱ्या वर्षातच मध्येच सोडला होता.

डीसीपी सांगतात, त्यानं कुटुंबीयांना आपण मल्लारेड्डी कॉलेजमध्ये बीटेक करत असल्याचं सांगितलं होतं. पण प्रत्यक्षात तो हैदराबादमध्ये छोटी-मोठी कामं करून उदरनिर्वाह करत असे आणि सध्या बेरोजगार होता.

"तो मुलींचे फोटो वापरून इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर बनावट खाती तयार करायचा. त्यानंतर लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट किंवा फॉलो रिक्वेस्ट पाठवून आपण मुलगी असल्याचं भासवत संवाद सुरू करायचा. हळूहळू तो सेक्स चॅटकडे वळायचा आणि संबंधित व्यक्तींकडून नग्न फोटो व व्हीडिओ मिळवून ते सेव्ह करायचा," असं पोलिसांनी सांगितलं.

पोलिसांच्या माहितीनुसार, नग्न फोटो आणि व्हीडिओ मिळवल्यानंतर पवन खंडणी उकळण्यास सुरुवात करत असे.

डीसीपी किरण खरे म्हणाले, "खंडणी उकळताना तो आतापर्यंत ज्या मुलीच्या नावाने चॅट करत असे, तिचा मोठा भाऊ असल्याचं सांगायचा. फोन, व्हॉट्सॲप आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून तो संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून पैसे मागायचा. माझ्या बहिणीनं आत्महत्या केली आहे किंवा मी पोलिसांत तक्रार करीन, अशी धमकीही द्यायचा."

पोलीस सांगतात, पवननं यासाठी कोलकात्यातील एका मॉडेलचे अनेक फोटो वापरले होते. या संदर्भात त्या मॉडेलशी संपर्क साधून तिला सावध करण्यात आलं आहे.

यात पोलीस अधिकारी, प्राध्यापक, सरकारी कर्मचारी, सॉफ्टवेअर इंजिनिअर, डॉक्टर आणि इतर विविध व्यवसायांतील सुमारे 1,000 जणांशी त्याने अशा प्रकारे सेक्सचॅट केल्याचं पोलिसांच्या तपासात उघड झालंय.

किरण खरे म्हणाले, "या लोकांचं वय 22 ते 70 वर्षांदरम्यान आहे. त्यांच्यापैकी 82 जणांचे नग्न फोटो आणि व्हीडिओ आमच्या हाती लागले आहेत."

पीडितांमध्ये तेलंगणा, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, पंजाब यांसह सौदी अरेबिया, तुर्की, पाकिस्तान आणि कॅनडातील नागरिकांचाही समावेश आहे.

पोलिसांच्या मते, पवनला आतापर्यंत या कारवायांमधून 25.16 लाख रुपये मिळाले होते.

तपासादरम्यान पवनने 13 बनावट इन्स्टाग्राम आयडी आणि 14 बनावट फेसबुक पेज तयार केल्याचं उघड झालं.

डीसीपींनी नागरिकांना या खात्यांकडून संदेश आल्यास सावध राहण्याचं आवाहन केलं आहे. आर्थिक फसवणूक झाल्यास तातडीने पोलिसांत तक्रार करण्याचंही त्यांनी सांगितलं.

पोलिसांनी त्याची बनावट फेसबूक आणि इन्स्टाग्राम खाती जाहीर केली आहेत.

या प्रकरणाचा उलगडा पवन कुमारनं स्वतःच्या मित्रालाच फसवल्यानंतर झाला.

रमेश (नाव बदललेलं) या मित्राने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. रमेशच्या म्हणण्यानुसार, CITD मध्ये शिक्षण घेत असताना त्याची पवनशी ओळख झाली होती.

सप्टेंबर 2021 मध्ये त्याला 'Moon Baby 5973' या इन्स्टाग्राम खात्यावरून फ्रेंड रिक्वेस्ट आली.

"मला या खात्यावर संशय आला. हे खाते पवननंच तयार केलं असावं असं वाटलं. मी त्याला विचारलं तेव्हा त्यानंच ते बनावट खाते असल्याचं कबूल केलं. त्यानंतर मला त्याच्याशी मैत्री ठेवायची नव्हती," असं रमेशने सांगितलं.

रमेशच्या म्हणण्यानुसार, नंतर तो दुसऱ्या वसतिगृहात राहू लागला. मात्र पवननं त्याला पुन्हा आपल्या सोबत राहायला येण्यास सांगितलं.

तक्रारीनुसार, या काळात दोघांमध्ये लैंगिक संबंध निर्माण झाले. रमेशचा आरोप आहे की पवन त्याच्यावर दबाव टाकत होता आणि ब्लॅकमेल करून संबंध ठेवण्यास भाग पाडत होता.

तक्रारीत पुढे म्हटलं आहे की, पवननं व्हीडिओ रेकॉर्डिंगची धमकी देत त्याच्याकडून ऑनलाइन पद्धतीनं 1.50 लाख रुपये आणि रोख 2.50 लाख रुपये असे एकूण 4 लाख रुपये उकळले.

17 ऑक्टोबर रोजी सैदाबाद पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. त्यानंतरच्या तपासात हे संपूर्ण हनीट्रॅप रॅकेट उघडकीस आलं.

पोलिसांचा सल्ला

डीसीपी किरण खरे सांगतात, "सोशल मीडियावर एखाद्या खात्याकडून फ्रेंड रिक्वेस्ट आल्यास त्या खात्याची पडताळणी करा. विशेषतः अनोळखी खात्यांमधून संदेश आल्यास सावध राहा. सुरुवातीला मैत्र

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता



बोरी जिल्हा परिषद प्रशाला शाळेत मराठवाडा पदवीधर मतदार संघ निवडणूक 2026 च्या अनुषंगाने बोरी येथे 371 बुथवर मतदानाचा हक्क बजावताना डावीकडून काँग्रेसचे नागसेन भेरजे, पदवीधर सतीश शिंपले, पत्रकार संतोष लहाने भाजपचे वामनराव शिंपले ,अशोक खिस्ते, पत्रकार रामभाऊ ढाकरगे शेख आरेफ दिसत आहेत.

पाण्याचा काटकसरीने वापर करा – शेख सलीम



अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड-सोयगाव तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी केले आहे. संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आतापासूनच पाण्याची बचत करणे, उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये, पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, तसेच तलाव, विहिरी आणि अन्य जलस्रोतांचे संरक्षण करावे, असे त्यांनी सांगितले.

अनधिकृत पाणी उपसा टाळावा

धरणे, कालवे, नद्या, तलाव आणि सार्वजनिक जलस्रोतांमधून अनधिकृतपणे पाणी उपसा करू नये. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पाण्याचा वापर नियोजनपूर्वक करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

सिल्लोड व सोयगाव तालुक्यातील नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्रामपंचायतींनी पाणी बचतीच्या प्रयत्नांना सहकार्य करावे. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रत्येकाने आजपासूनच पाणी बचतीची सवय लावून घ्यावी. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, त्याचा जपून वापर करणे गरजेचे आहे, असे आवाहन पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026

2 हजार 986 शेतकऱ्यांचा समावेश

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी- राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत आधार प्रमाणीकरणासाठी चौथी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत परभणी जिल्ह्यातील २ हजार ९८६ शेतकऱ्यांचा समावेश आहे. संबंधित पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण व जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) विकास जगदाळे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजी सदर योजना जाहीर केली. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, त्यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने तयार केलेल्या पोर्टलवर परभणी जिल्ह्यातील बँकांनी एकूण १ लाख ६० हजार ७६९ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे.

या माहितीच्या संगणकीय प्रक्रियेनंतर आधार प्रमाणीकरण करण्यासाठीपात्र लाभार्थ्यांची पहिली यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत ७९ हजार ८५५ शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यानंतर ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या यादीत २४ हजार ३७४ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला. तिसऱ्या यादीत २९ हजार ५९४ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला.

आता २२ ऑक्टोबर २०२६ रोजी चौथी यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यात आणखी २ हजार ९८६ शेतकऱ्यांचा समावेश आहे. आधार प्रमाणीकरणासाठी तीनही याद्यांमधील शेतकऱ्यांची संख्या विचारात घेता, एकूण १ लाख ३६ हजार ८०९ शेतकरी संख्या आहे.

आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळविण्याच्या दृष्टीने आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया महत्त्वाची आहे. त्यामुळे यादीत नाव असलेल्या पात्र शेतकऱ्यांनी संबंधित बँक शाखा किंवा सहकारी संस्थेशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

परभणी शहर व जिल्ह्यातील सर्रास ठोक गुटखा विक्री करणारे व पोलीस प्रशासनातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करा

सलीम इनामदार यांची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**परभणी शहरासह जिल्ह्यात तंबाखूजन्य पदार्थावर कायम बंदी असताना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होत असल्याने गुटखा विक्री करणारे ठोक विक्रेते व पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांची सहानिशा करून चौकशी केल्यास निष्पन्न होणार प्रशासनातील कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची व विक्रेत्यांवर कारवाई करण्याची लोक श्रेय मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार यांनी एका निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्याकडे मागणी केली आहे

अनेक पोलीस कर्मचाऱ्यांचे मोबाईल लोकेशन अथवा त्यांच्या संपर्कात असलेल्या व्यक्ती च्या मोबाईल द्वारे संबंधित गुटके विक्रेत्यांच्याशी संपर्क लोकेशन द्वारे निष्पन्न होतील सर्रास अवैध गुटखा विक्री होत असल्याने प्रशासकीय कार्यालय गुटख्याच्या पिचकाऱ्याने रंगलेल्या घाण व स्वच्छता दुर्गंधीयुक्त दिसत आहे

गुटखा विक्री करणारी कार्यरत असलेली टोळी विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी स्थानिक गुन्हे शाखेतील काय कर्मचाऱ्यांच्या देखील यात समावेश असल्याचे समजते त्यामुळे हे कृत्य करणाऱ्या विरुद्ध कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे सध्या बंदी असलेला गुटखा आर एम डी माणिकचंद गोवा सीतार राजनिवास विमल रजनीगंधा सुगं त तंबाखू रत्नाछाप तंबाखू बाबा तंबाखू तुलसी तंबाखू किमाम यासारख्या तंबाखूजन्य पदार्थामुळे अनेकांना कर्करोग होत असल्याने महा भयानक कॅन्सर सारखे रोग या सेवनामुळे होत आहे शाळकरी व महाविद्यालयातील विद्यार्थी या गुटक्याचे व तंबाखूच्या आहारी जात आहे यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी सलीम इनामदार यांनी केली आहे या निवेदनाची प्रत सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन या विभागालाही देण्यात आली आहे अन्न व औषध प्रशासन विभाग का डोळ झाक करत आहे असा प्रश्नही परभणीतील जनतेला पडलेला आहे.

जलपुनर्भरणासाठी शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा; जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांचे आवाहन

स्वत:च्या निवासस्थानी व शेतात जलतारा शोषखड्डे तयार करुन लोकसहभागातून जलसंधारणाची चळवळ उभी करा

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**-- भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तसेच भूजल पातळी वाढविण्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जलतारा शोषखड्ड्यांची निर्मिती आणि जलपुनर्भरणाच्या उपाययोजनांना लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन आपल्या निवासस्थानी तसेच स्वतःच्या शेतात प्राधान्याने जलतारा शोषखड्डे तयार करावेत आणि या कामाचे छायाचित्र (सेल्फी) काढून जनजागृतीसाठी प्रसारित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे, विहिरी व बोअरवेलचे पुनर्भरण करणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करणे यासाठी जलतारा शोषखड्डे उपयुक्त ठरू शकतात. प्रत्येकाने आपल्या परिसरात उपलब्ध जागा आणि भौगोलिक परिस्थितीनुसार जलपुनर्भरणाचे उपाय अवलंबल्यास जलसंधारणाच्या प्रयत्नांना व्यापक लोकसहभाग मिळू शकतो.

शासकीय अधिकारी व कर्मचारी हे समाजासाठी आदर्श निर्माण करणारे घटक आहेत. त्यांनी स्वतःच्या कृतीतून जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केल्यास सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विविध सामाजिक संघटनांनाही यासाठी प्रेरणा मिळेल. त्यामुळे जास्तीत जास्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जलतारा शोषखड्ड्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करून त्यासोबतची छायाचित्रे प्रसारित करावीत आणि आपल्या सहकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांसह नागरिकांमध्ये जलपुनर्भरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही जिल्हाधिकारी यांनी नमूद केले. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, आज केलेले जलपुनर्भरणाचे प्रयत्न उद्याच्या पाणी सुरक्षेसाठी मोलाचे ठरणार आहेत. त्यामुळे 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत जिल्ह्यात जलसंधारणाची व्यापक लोकचळवळ निर्माण करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

कापूस श्रेडर घटकासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: कापूस उत्पादकता अभियान ही योजना सन 2026-27 मध्ये राज्यातील 19 जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत स्थानिक पुढाकाराच्या बाबींतर्गत कापूस श्रेडर हा घटक राबवायचा आहे. त्यासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, संस्था व कृषि क्षेत्रात कार्यरत पात्र सहकारी संस्थांकडून अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत.

या घटकासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी/संस्था व कृषि क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था लाभ घेण्यास पात्र आहेत. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. शेतकरी लाभार्थ्यांची निवड प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर करण्यात येणार आहे. कापूस श्रेडरकरिता अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना किंमतीच्या 50%, कमाल 75 हजार रुपये व सर्वसाधारण प्रवर्गातील शेतक-यांना किंमतीच्या 40 %, कमाल 60 हजार अनुदान देय आहे. योजनेतील अहिल्यानगर, धुळे, जळगाव, नंदूरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, अकोला, वर्धा, नागपूर चंद्रपूर व गडचिरोली या 19 जिल्ह्यांतील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी कापूस श्रेडरकरिता **https:**//mahadbt.maharashtra.gov.in/farmer/Agril-ogin/Agrilogin या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन कृषि आयुक्त यांच्याद्वारे करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी विभागीय कृषी सह संचालक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उप विभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन कृषि आयुक्तालयाकडून करण्यात आले आहे.

परभणी वनविभागात कर्तव्यात कसूर? कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अजगराचा मृत्यू; जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी!

परभणी | प्रतिनिधी : परभणी येथील वनविभागाच्या प्रादेशिक कार्यालयात अजगर आढळून आल्याची गंभीर घटना दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी समोर आली. तक्रारीनुसार, कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी आवश्यक काळजी व सुरक्षिततेची व्यवस्था न केल्यामुळे तसेच कर्तव्यामध्ये कसूर झाल्यामुळे अजगराचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे वन्यजीव संरक्षण आणि वनविभागाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

वन्यजीवांचे संरक्षण करणे ही वनविभागाची महत्त्वाची जबाबदारी असताना कार्यालयाच्या परिसरात आढळलेल्या अजगराला सुरक्षितपणे हाताळणे, त्याला योग्य वातावरण उपलब्ध करून देणे आणि नियमानुसार आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अजगराचा मृत्यू झाल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.



या प्रकरणी वनसंरक्षक (CF), प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. संबंधित वनरक्षक, वनपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकारी (RFO) यांच्या भूमिकेची सखोल विभागीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच अजगराच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी शवविच्छेदन (PM) अहवाल मागवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची CCF स्तरावर स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी आणि वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

सोयगावच्या उर्दू जिल्हा परिषद शाळेत मूलभूत सुविधांचा अभाव

सोयगाव, दि.२१ (प्रतिनिधी)



सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक उर्दू शाळेत स्वतंत्र इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यांसह इतर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. यासंदर्भात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड यांना लेखी निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अधिक असून, पुरेशा स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, मूलभूत सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमांवरही परिणाम होत आहे.

या समस्यांबाबत यापूर्वीही चर्चा करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन शाळेसाठी स्वतंत्र इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. सोयगाव येथील उर्दू शाळेच्या मूलभूत सुविधांसंदर्भात गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड यांना निवेदन देताना जुबेर शाह,फिरोज पठाण,अनिस मौलाना,शाकीर शेख आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

नगरेश्वर मंदिरात विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती स्थापना रौप्यमहोत्सवानिमित्त धार्मिक महोत्सव

ज्ञानेश्वरी पारायण, दीपोत्सव, विविध धार्मिक कार्यक्रमांसह 30 ऑक्टोबरला महोत्सवाची सांगता

जिंतूर : येथील श्री नगरेश्वर मंदिरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती स्थापनेला २५ वर्षे पूर्ण होत असल्याने आर्य वैश्य समाज, जिंतूर यांच्या वतीने शुक्रवार, दि. २३ ते शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आठ दिवसीय भव्य धार्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध धार्मिक विधी, ज्ञानेश्वरी पारायण, दीपोत्सव, ज्येष्ठांचा सत्कार तसेच महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहेत.



महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी अभिषेक व सकाळी ७ ते ९ या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण आयोजित करण्यात आले आहे. शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी पुष्पार्चना, रविवार, २५ ऑक्टोबर रोजी दीपोत्सव, सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठांचा सत्कार, मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी कुंकुमार्चना, तर बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी तुळशी अर्चना होणार आहे. गुरुवार, २९ ऑक्टोबर रोजी २५ जोडप्यांचे स्वागत करण्यात येणार आहे.

शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता होणार असून, यावेळी स्वामी महेशानंद पुरी महाराज यांचे पाद्यपूजन, गोदान आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता महाआरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. या धार्मिक महोत्सवात समाजबांधवांसह सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य वैश्य समाज, जिंतूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

यजमान : सौ. नंदा धोंडोपंत कोकडवार, सौ. क्षमता आकाश कोकडवार व सौ. प्रिती अविनाश कोकडवार.

"पोलीस. मुख्यालय येथे स्मृतीदिवस" मोठ्या उत्साहात साजरा



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**स्मृति दिवसाचे औचित्य साधून मा.पंकज कुमावत, पोलीस अधीक्षक, परभणी यांचे संकल्पनेतून आज दिनांक 23/10/2026 रोजी सकाळी 07.00 वा. पोलीस मुख्यालय येथे STUDENT POLICE CADET चे शालेय विध्यार्थी यांना प्रात्यक्षिक व प्रदर्शन पाहण्यासाठी बोलावण्यात आले होते. सदर ठिकाणी 1) भारतीय बालविद्या मंदिर 2) संबोधी विद्यालय 3) शारदा विद्यालय व 4) प्रभावती विद्यालय असे 4 शाळेतून 400 विध्यार्थी यांना पोलीस मुख्यालय येथे येण्यासाठी वाहनाची व्यवस्था पोलीस विभागाकडून करण्यात आली होती. सदर ठिकाणी विध्यार्थी व शिक्षक यांचेसाठी 1) पोलीस बँड पथक 2) डॉग स्कॉड 3) बॉम्ब शोध पथक (BDDS) 4) सेल्फ डिफेन्स (कराटे) 5) पोलीस विभागात वापरले जाणारे शस्त्र व दारुगोला 6) पोलीस विभागात दैनंदिन वापरले जाणारे वाहन यांची माहिती तसेच ट्राफिस नियम यांची माहिती देण्यात आली आहे. सदर ठिकाणी विध्यार्थी यांना फळाचे वाटप करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे शेवटी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत घेऊन विध्यार्थी यांना त्यांचे शाळेत 10.00 वा. सु. पोलीस वाहनांनी सुरक्षित सोडण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात सर्व विध्यार्थी व शिक्षकांनी पाहून आनंद भेटल्याचे कळवले. सदर कार्यक्रम मा. तानाजी चिखले अप्पर पोलीस अधीक्षक, परभणी व मा. रवींद्र पेरगुलवार, पोलीस उपअधीक्षक (गृह) यांचे मार्गदर्शनाखाली 1) श्रीनिवास रोयलावार, पोलीस निरीक्षक (PRO) 2) श्री दीपक बोरसे, पोलीस निरीक्षक (HQ) 3)श्री तोटेवाड, BDDS 4) श्री नर्सिकार RSI 5) श्री कदम MTO पोह/दिपक जंबुरे यांचे एकत्रित उत्तम नियोजनाने पार पडले आहे.

पुरणवाडीत आरोग्य तपासणी शिबिर; 75 नागरिकांची तपासणी

अतिजोखमीच्या 15 नागरिकांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



कन्नड : 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' आणि 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'तिशीचा पल्ला – आरोग्य तपासणी व सल्ला' या उपक्रमातून पुरणवाडी येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात गावातील ७५ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तर अतिजोखमीचे आढळलेल्या १५ नागरिकांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र करंजखेड अंतर्गत उपकेंद्र उंबरखेडा येथे येणाऱ्या पुरणवाडी येथे २२ ऑक्टोबर रोजी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी नागरिकांना आरोग्य व स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. तसेच स्तनाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, उच्च रक्तदाब आणि मधुमेह या आजारांची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि नियमित तपासणीचे महत्त्व समजावून सांगितले. नागरिकांचे समुपदेशनही करण्यात आले.

तपासणीदरम्यान आजारी आढळलेल्या नागरिकांना आवश्यकतेनुसार किरकोळ उपचार व औषधोपचार देण्यात आले. अतिजोखमीच्या नागरिकांना पुढील तपासणी आणि उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच आरोग्य तपासणी व आरोग्यविषयक सल्ला उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. भरत डी. नवले, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाची 'जलतारा' व शेत शोषखड्डा योजना

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी**जलतारा आणि शोषखड्डे हे पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे, विहिरी व बोअरवेलचे पुनर्भरण करणे आणि पाणीटंचाई कमी करणे यासाठी उपयुक्त उपाय आहेत.

महाराष्ट्रात २०२६ मध्ये कृषी विभागामार्फत 'जलतारा' संकल्पनेवर आधारित शेत शोषखड्डा योजना राबविण्यात येत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. तसेच परभणी जिल्ह्यात शासकीय कार्यालयांच्या परिसरात जलतारा शोषखड्डे तयार करण्याची विशेष मोहीम जाहीर झाल्याचे वृत्त आहे.

१. जलतारा म्हणजे काय? : * शेतातील पावसाचे वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी विशिष्ट पद्धतीने शोषखड्डा तयार करणे. * पाण्याचा जमिनीत झिरपण्याचा वेग वाढविणे. * विहिरी व बोअरवेलच्या भूजल पुनर्भरणास मदत करणे. * पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी जमिनीत साठवण्यास प्रोत्साहन देणे.

२. शोषखड्डा योजनेचा संभाव्य लाभ : शेत शोषखड्डा योजनेविषयी उपलब्ध वृत्तानुसार, कृषी विभागामार्फत यंत्राच्या साहाय्याने शेतात शोषखड्डे तयार करण्याची सुविधा देण्याची तरतूद आहे. मात्र, अनुदानाची रक्कम, पात्रतेच्या अटी आणि प्रत्यक्ष लाभाचे स्वरूप अधिकृत मार्गदर्शक सूचनांवरून निश्चित करणे आवश्यक आहे.

३. शेतकऱ्यांसाठी पात्रता व अर्ज : २५ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या वृत्तानुसार पुढील अटी नमूद आहेत. या अटी संपूर्ण महाराष्ट्रात तशाच लागू आहेत असे अधिकृत शासन निर्णय तपासल्याशिवाय गृहीत धरू नये.

बाब वृत्तात नमूद तपशील : जमीन किमान ०.१० हेक्टर, सातबारा स्वतःच्या नावावर, ॲग्रीस्टॅक फार्म आयडी आवश्यक, संयुक्त खाते सहखातेदारांचे संमतीपत्र, शोषखड्ड्याचा आकार १.५ × १.५ × १.८ मीटर, लाभाचे वितरण प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य, संपर्क तालुका कृषी अधिकारी किंवा कृषी सहाय्यक

४. परभणी जिल्ह्यातील विशेष मोहीम : २१ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध वृत्तानुसार, परभणी जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांच्या परिसरात जलतारा शोषखड्डे तयार करणे, छतावरील पावसाचे पाणी संकलित करणे आणि विहिरी-बोअरवेलचे पुनर्भरण करणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. कामांचे जिओटॅग छायाचित्रांसह दस्तऐवजीकरण व अनुपालन अहवाल सादर करण्याचाही उल्लेख आहे.

गलगंड प्रतिबंधासाठी आयोडीन युक्त मिठाचा वापर महत्त्वाचा

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी : परभणी**दैनंदिन आहारात आयोडीनच्या कमतरतेमुळे होणारे गलगंड, थायरॉईडचे विकार तसेच बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दैनंदिन आहारात नियमितपणे आयोडीनयुक्त मिठाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सूरवसे यांनी केले आहे.

२१ ऑक्टोंबर जागतिक आयोडीन न्यूनता विकार नियंत्रण दिनानिमित्त आयोडीनचे महत्त्व आणि त्याच्या कमतरतेमुळे उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. आयोडीन हे शरीराची योग्य वाढ होण्यासाठी तसेच थायरॉईड ग्रंथीचे कार्य सुरळीत राहण्यासाठी आवश्यक असलेले सुक्ष्म पोषक तत्त्व आहे. शरीरात आयोडीनची कमतरता निर्माण झाल्यास गलगंडासह, थायरॉईडचे विविध विकार उद्भवू शकतात.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

शरणापूरच्या साईबाबा मंदिराचा 15 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

पालकमंत्री संजय शिरसाट, परमानंदगिरीजी महाराज यांची उपस्थिती; महाप्रसादाचा भाविकांनी घेतला लाभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : 'मिनी शिर्डी' म्हणून ख्याती असलेल्या शरणापूर येथील श्री साईबाबा मंदिराचा १५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, श्री श्री १००८ परमानंदगिरीजी महाराज आणि प्रसिद्ध वास्तुतज्ज्ञ व ज्योतिर्विद आनंद पिंपळकर गुरुजी यांची विशेष उपस्थिती होती.

वर्धापन दिनानिमित्त पहाटे श्री साईबाबांचा महाअभिषेक व विधिवत पूजा मंदिराचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी साईभक्त व ब्राह्मण उपस्थित होते. त्यानंतर सकाळी ११ वाजता मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली.

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी मंदिराचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थितांना मार्गदर्शन केले. परमानंदगिरीजी महाराज यांनी मंदिर संस्थानच्या कार्याचे कौतुक केले. आनंद पिंपळकर गुरुजी यांनी गेल्या १५ वर्षांपासून मंदिराच्या माध्यमातून सुरू असलेल्या समाजकार्याबद्दल संस्थापक अध्यक्षांचे अभिनंदन केले. त्यांनी वास्तुशास्त्र व ज्योतिषशास्त्राविषयी मार्गदर्शन करत उपस्थित नागरिकांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली.

संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून आभार मानले. मंदिराच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची, सुरू असलेल्या विकासकामांची तसेच भविष्यातील नियोजित कामांची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला.

या सोहळ्याला माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, त्र्यंबक तुपे, अशोक पटवर्धन, केंद्रे, भांगे, किशोर थोरात, अनिल चोरडिया, अर्जुन आदमाने, वाडकर, साईदत्त सामानगावकर, जोंधळे, खन्ना, रत्नकुमार साबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्याध्यक्ष विशाल आदमाने पाटील, बाळासाहेब शिंदे, बाबा पाटील, सांडू पवार, कृष्णा आदमाने, बाळू जाधव, प्रतीक पखाले, गोकुळ सुरभाइये, रितेश गवळी यांच्यासह सर्व साईभक्त मित्र मंडळ व साई पालखी समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

आध्यात्मिक शक्तीशिवाय जीवन अपूर्ण : चंद्रकांत खैरे

राज्यस्तरीय महिला कीर्तन महोत्सवाला सदिच्छा भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



वैजापूर : आध्यात्मिक शक्तीशिवाय जीवन अपूर्ण आहे, असे प्रतिपादन शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे सुरू असलेल्या जगदंबा माता नवरात्र कोजागिरी महोत्सवांतर्गत आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित माँसाहेब मीनाताई बाळासाहेब ठाकरे राज्यस्तरीय महिला कीर्तन महोत्सवाच्या दहाव्या दिवशी चंद्रकांत खैरे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी हभप बाल कीर्तनकार सानिकाताई गायकवाड (नाशिककर) यांची कीर्तनसेवा झाली.

याप्रसंगी आयोजकांच्या वतीने चंद्रकांत खैरे यांचा सन्मान करण्यात आला. खैरे यांच्या वतीने कीर्तनकार सानिकाताई गायकवाड तसेच सर्व भजनी मंडळाचा सत्कार करण्यात आला. कीर्तनाच्या माध्यमातून अध्यात्मिक विचार, संस्कार आणि भक्तिभाव समाजापर्यंत पोहोचत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य हुसेन शेख, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब जानराव उपस्थित होते. कीर्तनदाते म्हणून जिल्हा परिषद सदस्य (बोरसर) तथा शिवसेना तालुकासंघटक मनोज पाटील गायके यांची उपस्थिती होती.

महोत्सवाचे आयोजक मुरलीधर थोरात (उपतालुका प्रमुख), कैलास बहाळस्कर (विभाग प्रमुख), शहरप्रमुख विजय थोरात, संतोष थोरात, उपविभागप्रमुख दत्तात्रय गाडेकर, अशोक वाकचौरे, सुभाष गायकवाड, बाबासाहेब पवार, गणेश थोरात, विलास अक्कर, ज्ञानेश्वर पवार, मोसिन शेख, अहमद खान, रफिक कुरेशी, प्रकाश आंबेकर, शिवाजी जाधव, ऋषी थोरात आणि दादासाहेब कदम यांच्यासह भाविक भक्त उपस्थित होते.

बीएमजी अॅकॅडमीची राज्यस्तरीय स्पर्धेत धडक; पाच सुवर्ण, तीन रौप्यपदकांची कमाई

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलींची जिद्द; खेळाडूंच्या यशाचे सर्वत्र कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने आयोजित विभागीय धावणे स्पर्धेत बीएमजी अॅकॅडमीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत पाच सुवर्ण आणि तीन रौप्यपदकांची कमाई केली. या यशाच्या जोरावर अॅकॅडमीच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय स्पर्धेत धडक मारली आहे.

या स्पर्धेत तनिष्का गर्जे हिने ४०० मीटर आणि ६०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. धनश्री नरोडे हिने ४०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्णपदक, तर ८०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्यपदक मिळवले. रेश्मा बहुरे हिने ८०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्णपदक, तर ४०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. वैष्णवी नरोडे हिने थाळीफेकमध्ये सुवर्णपदक, तर गोळाफेकमध्ये रौप्यपदक मिळवले.

या खेळाडूंना बी. एम. गर्जे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलींनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, राज्यस्तरीय स्पर्धेतील कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

हिंगोली येथे आयोजित होणार भव्य ऑल इंडिया हॉकी टूर्नामेंट स्पर्धा : केशव दुबे



हिंगोली : शहरात येत्या डिसेंबर जानेवारी मध्ये ऑल इंडिया हॉकी टूर्नामेंट चे आयोजन करण्यात येणार असून सदरील टूर्नामेंट हे हिंगोली हॉकी हिंगोली च्या संघटनेच्या वतीने लवकरच टूर्नामेंट ची तारीख जाहीर करण्यात येणार आहे सदरील टूर्नामेंट हे पोलीस परेड ग्राउंड येथे घेण्यात येणार असून या स्पर्धेत हिंगोलीतील क्रीडाप्रेमींनी या ऑल इंडिया हॉकी स्पर्धा लान सहकार्य करावे असे आवाहन हॉकी हिंगोली च्या वतीने करण्यात आले असून येत्या रविवारी हॉकी संघटनेची स्पर्धेनिमित्त नियोजन बैठकीचे आयोजन शासकीय विश्रामगृह येथे दुपारी दोन वाजता करण्यात आली आहे याच बैठकीनंतर स्पर्धेच्या तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे बैठकीमध्ये सर्व हिंगोलीतील हॉकी च्या पदाधिकारी सह आजी माझी खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन हॉकी हिंगोली चे सचिव केशव दुबे यांच्या वतीने करण्यात आले आहे

बिडकीनमध्ये पथसंचलनाने संघाचा विजयादशमी उत्सव



बिडकीन प्रतिनिधी - येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखेकडून विजयादशमी उत्सव, शस्त्रपूजन व बिडकीन शहरातील विविध भागातुन पथसंचलन करण्यात आले.

खिंवसरानगर मैदानावरून २२ आक्टोंबर रोजी सायंकाळी ५ वाजता पथसंचलनास सुरुवात करण्यात आले. शिस्तबद्ध पथसंचलन छत्रपती संभाजी महाराज चौक, निलजगाव फाटा, मारवाडी गल्ली, सराफा गल्ली, कोकण वेस मारोती मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर , बसस्थानक , ग्रामपंचायत कार्यालयमार्गे पुन्हा मैदानावर पोचले. दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभाग प्रचारक श्रीरामजी पांडे, प्रमुख पाहुणे डॉ सुरेशजी जंगले, वैजापूर जिल्हा संघचालक अॅड राजेंद्रजी गोर्डे, बिडकीन तालुका संघचालक संतोषजी मोदी यांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. सुरेशजी जंगले मार्गदर्शन करतांना हिंदुत्व म्हणजे केवळ विचार नसून आचरणात उतरवायची राष्ट्रनिष्ठा आहे, तसेच समाजातील डॉक्टर, वकील, शिक्षक, अभियंते यांनी प्रत्येकाने आपल्या ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांसाठी करावा असे म्हणाले तर प्रमुख वक्ते विभाग प्रचारक श्रीरामजी

पांडे यांनी मार्गदर्शन करतांना विजयादशमी हा शक्तीचा आणि संस्कृती जपणारा उत्सव असुन समाजात जातिभेदाला थारा न देता बंधुभाव, एकात्मता आणि समरसता वाढवणे हेच संघाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.तसेच संघ कोणत्याही जातीच्या किंवा धर्माच्या विरोधात नसून देशा विरुद्ध गद्दारी करणाऱ्यांच्या विरोधात आहे म्हणाले.

दरम्यान कार्यक्रमांचे प्रास्ताविक अॅड. शिवप्रसाद औटी यांनी केले. विकास ढगे यांनी सांघीक गीत तर गौरव कुलकर्णी यांनी एकल गीत सादर केले, ऋषिकेश आगाज यांनी सूत्रसंचालन करत आभार मानले. याप्रसंगी संघपरिवारातील पदाधिकारी, स्वयंसेवक आणि नागरिक उपस्थित होते.





मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911